दाखल तारीख : ०१/०१/२०१८
नोंदणी तारीख : ०१/०१/२०१८
निकाल तारीख: २०/०८/२०१८
कालावधी :००व.०७ म.१९ दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणीन्यायालय क्र.५, पुसद, जिल्हा यवतमाळ**
**यांचे न्यायालय**
**(श्रीमती मिनाक्षी म. धनराज यांचे समक्ष)**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ०१/२०१८**   **निशाणी क्रमांक: २३**

**फिर्यादी** : महाराष्ट्र शासन,
मार्फत पोलीस निरीक्षक,
पोलीस ठाणे, पुसद शहर
ता. पुसद, जि. यवतमाळ

—विरुद्ध—

**आरोपी** : १ अविनाश देवसिंग पवार
वय २६ वर्षे, धंदा: मजूरी,

२. मनोहर देवसिंग पवार
वय ४० वर्षे, धंदा मजूरी
दोघेही रा. राम नगर, मोहा, पुसद, ता.पुसद
जि.यवतमाळ.

**आरोप: भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०६, सह कलम ३४ अन्वये**

---

श्री सि. बी. उईके, अभियोग पक्षा तर्फे सहायक सरकारी अभियोक्ता
श्री ए. टी. राठोड, दोन्ही आरोपी तर्फे विधिज्ञ

---

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक २०/०८/२०१८)

०१)	प्रस्तुत खटला दोन्ही आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०६ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला आहे.

०२)	प्रकरणाची थोडक्यात हकिकत अशी आहे की, दिनांक ०८/११/२०१७ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता फिर्यादी राम बाबुसिंग पवार हा त्याचा लहान भाउ लखन याला बोलाविण्याकरिता रामनगर येथील अजय राठोड यांचे किराणा दुकानात गेला होता. त्यावेळी त्याचे दुकानासमोर आरोपी क्र. १ अविनाश हा राम राठोड याचे सोबत वाद करित होता. आरोपी अविनाश फिर्यादिकडे बघून असे म्हणाला की, “तु व तुझे आईवडीलच रामला लावून देतात.”. फिर्यादीने आरोपी अविनाश असे का म्हणाला, हे विचारण्यासाठी आरोपीच्या घरासमोर बोलावून नेले. फिर्यादीचे आईवडील सुध्दा अविनाशला समजविण्यासाठी तिथे आले होते. आरोपी अविनाशची आई सौ. देवकीबाई हिच्या समोर, फिर्यादी आरोपीला विचारणा करू लागला, त्यावेळी आरोपी अविनाश याने फिर्यादीच्या डोक्यावर दगड फेकून मारला. आरोपी क्र. २ मनोहर याने फिर्यादी, फिर्यादीचे वडील आणि फिर्यादीचा भाउ लखन यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ करणे सुरू केले. फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत त्याच दिवशी पोलीस स्टेशन पुसद शहर येथे जावून रिपोर्ट दिला. त्यावर अपराध क्रमांक ४९९/१७ कलम ३२४, ३२३, ५०६ सह कलम ३४ भा. दं. वि. प्रमाणे दाखल करण्यात आला. तपास अधिकारी श्री मोतीराम जाधव, पो.हे.कॉ. ब. नं. १९२९ यांनी प्रकरणाचा तपास केला आणि तपासाअंती दोन्ही आरोपी विरूध्द वरील कलमा अंतर्गत आरोप पत्र न्यायालयात दाखल केले.

०३)	अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने दोन्ही

आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०६ सह कलम ३४ नुसार दोषारोप (नि. क्र. ०६) निश्चित करुन आरोपीला मराठी भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपी क्र. १ व २ यांनी गुन्हा कबूल नसल्याचे (अनुक्रमे नि.क्र. ०७ व ०८) सांगून प्रकरणात न्यायचौकशी करण्यास विनंती केली. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ख) प्रमाणे निवेदन घेण्यात आले नाही.

०५. सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद आणि अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले. सदर मुद्यांना मी माझे निष्कर्ष पुढील प्रमाणे दर्शविलेल्या कारणासह पुढील प्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक ०८/११/२०१७ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे दरम्यान राम नगर, मोहा, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी आपसात संगनमत करून, त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्तीसाठी, आरोपी क्र. १ याने फिर्यादीला डोक्यावर दगड मारून जखमी केले, ही बाब अभियोग पक्षाने सिद्ध केली आहे काय? | नकारार्थी |
| ०२. | वरील नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून, आरोपी क्र. २ याने फिर्यादीला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केली, ही बाब अभियोग पक्षाने सिद्ध केली आहे काय? | नकारार्थी |
| ०३. | वरील नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून, त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्तीसाठी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली, ही बाब अभियोग पक्षाने सिद्ध केली आहे काय? | नकारार्थी |
| ०४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

०६)　सरकार पक्षातर्फे आरोपींविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एकमेव साक्षीदार फिर्यादी राम बाबुसिंग पवार (सा.क्र.१) ला नि.क्र. २२ वर तपासले आहे. सरकार पक्षाचा पुरावा नि.क्र. ०१ वरील दि. ०६/०८/२०१८ रोजीचे आदेशानुसार बंद करण्यात आला. आरोपी तर्फे त्यांच्या बचावासाठी कुठलाही साक्षीदार तपासला गेला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०३</u>:—**

०७)　मुद्या क्रमांक ०१ ते ०३ हे एकमेकांशी संबधीत असून एकाच घटनेमुळे निर्माण झालेले मुद्दे आहेत. त्यांचे बाबत देण्यात आलेला पुरावा सारखाच असल्याने तिनही मुद्दे एकत्र विचारात घेण्यात आले आहेत. साक्षीदार क्र. ०१ राम याचे पुराव्यात असे आले आहे की, आरोपी क्र. ०१ व ०२ हे त्याचे चुलत भाउ आहेत. घटना अंदाजे एक वर्षापूर्वी संध्याकाळी आजेश किरणा दुकानासमोर मौजा मोहा, ता. पुसद येथे घडली होती. त्यावेळी आरोपींसोबत घरगुती कारणावरून शाब्दीक वाद झाला होता. त्यादिवशी फिर्यादी हा नालीमध्ये पडला असल्याने त्याचे डोके फुटले होते. रागाच्या भरात फिर्यादीने दोन्ही आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन पुसद शहर येथे जावून रिपोर्ट दिला होता. त्याने जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवालावरील त्याची सही ओळखली परंतु त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले आहे. साक्षीदार हा त्याचे जबानी रिपोर्ट व बयानातील मजकूर याला विसंगत असे त्याचे साक्षीत सांगत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची तोंडी विनंती केली. कलम १५४, भारतीय पुरावा अधिनियम, अन्वये उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु उलट तपासाच्या स्वरूपात प्रश्न विचारून सुध्दा साक्षीदाराने घटनेबाबत काहीही सांगितले नाही. त्यांनी आरोपी क्र. ०१ व ०२ हे त्यांचे चुलत भाउ असल्यामुळे, त्यांच्यातील वाद न्यायालयाबाहेर आपसात मिटला असल्याचे सांगितले आहे.

०८)        अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या वरील पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता स्पष्टपणे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी (सा.क्र.०१) हा अभियोग पक्षाला कोणत्याही मुद्यावर सहकार्य करत नाही. जेव्हा प्रकरणातील फिर्यादी जखमी साक्षीदार भियोग पक्षाला कोणत्याही मुद्यावर सहकार्य करत नाही तेव्हा इतर साक्षीदारांचा पुरावा आरोपीचा संबंध कथीत गुन्हयाशी जोडण्यासाठी फारसा उपयोगी पडू शकत नाही या कारणास्तव विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरून अभियोग पक्षाची पुराव्याची बाजू परिसिमीत करण्यात आली. दोन्ही आरोपींविरूध्द त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप (नि.क्र.०६) सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेला कुठलाही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्ष आणू शकला नसल्याने, आरोपींचे ३१३(१)(ख) प्रक्रिया संहिता प्रमाणे, जबाब नोंदविण्यात आलेले नाही.

०९)        श्री उईके अभियोग पक्षातर्फे विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता व श्री. ए. टी. राठोड, आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

१०)        प्रकरणातील गुन्हयाचे स्वरूप गंभीर असले तरी आरोपींचा संबंध कथीत गुन्हयाशी जोडण्यासाठी कोणताही पुरावा उपलब्ध नाही. सादर पुराव्यावरून पुढे असेही दिसून येते की, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे चुलत भाउ असल्यामुळे त्यांच्यातील वाद हा न्यायालयाबाहेर आपसात मिटला आहे (पुरसिस नि.क्र.२१). त्यामुळे फिर्यादीने त्याच्या तोंडी पुराव्यात आरोपी क्र. ०१ व ०२ विरूध्द कोणतेही भाष्य केले नाही. असे असले तरी फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणात आरोपी विरूध्द संशयापलीकडे गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची असते. अर्थात, अभियोग पक्ष आरोपीचे विरूध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३,५०६ सह कलम ३४ नुसार संशयापलीकडे गुन्हा सिध्द करू शकले नाही. त्यामुळे आरोपी क्र ०१ व ०२ हे प्रस्तुत प्रकरणातुन दोषमुक्त होण्यास हकदार

आहेत. सबब, मुद्दा क्रमांक ०१ व ०३ याला नकारात्मक निरीक्षण नोंदविले आहे.

## मुद्दा क्र. ०४

११) प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी क्र. ०१ व ०२ यांचे विरूध्द दोषारोप संशयापलीकडे सिध्द होवू शकलेला नाही, असे निरीक्षण मी वरील कारण मिमांसा देतांना नमुद केली आहे. त्यामुळे वरील विवेचना नंतर मुद्दा क्र. ०४ ला उत्तर म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## आदेश

०१) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार, आरोपी क्र. ०१ अविनाश देवसिंग पवार, वय २६ वर्षे आणि आरोपी क्र. ०२ मनोहर देवसिंग पवार, वय ४० यांना भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०६ सह कलम ३४ चे गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येत आहे. आरोपी यापुढे स्वतंत्र आहेत.

०२) आरोपी क्र. ०१ व ०२ यांचे बंधपत्र व जामीन पत्र रद्द करण्यात येत आहेत.

०३) आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी, कलम फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ अ प्रमाणे रूपये ७,५००/– प्रत्येकी, बंधपत्र व जामीन पत्र देवून पुर्तता करावी.

०४) प्रस्तुत प्रकरणातील जप्त केलेली मालमत्ता एक मुरमाचा लहान दगड ज्यावर हिरव्या रंगाचे ठिपके असलेला, वजन ५६ ग्रॅम , अं. किंमत ००/– रूपये हा अपील कालावधीनंतर नष्ठ करण्यात यावा.

०५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केले.

(श्रीमती मिनाक्षी म.धनराज)

दिनांक: २०/०८/२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र. ५, पुसद